दिनांक 19/10/2023 रोजीचा प्रशासकिय ठराव क्रं.156

विषय – विटा नगरपरिषद हद्दीत सन 2023-2024 या वित्तीय वर्षाकरीता विविध भागातील गटरसाठी लोखंडी जाळी बसविणेकामी दाखल ई निविदावर निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी विभाग प्रमुख यांची दिनांक 19/10/2023 रोजी मंजूर केलेली टिपणी.

विटा नगरपरिषद हद्दीत सन 2023-2024 या वित्तीय वर्षाकरीता विविध भागातील गटरसाठी लोखंडी जाळी बसविणेकामी खालील ई निविदा दाखल आहेत.

1) अशफाक जलालऊद्दीन मुल्ला — प्रति 1 kg र.रू.190/- सर्व करासहीत

2) अकबर मुमारक शिकलगार — प्रति 1 kg र.रू.210/- सर्व करासहीत

3) नजिर बादशाह शिकलगार — प्रति 1 kg र.रू.170/- सर्व करासहीत

उपरोक्त ई निविदापैकी नजिर बादशाह शिकलगार यांचे निविदेतील दर सर्वात कमी आहेत. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2013 मधील तरतूदीनूसार सर्वात कमी दराची निविदा मंजूर करीत आहे. याकामी रितसर करारपत्र करून कार्यारंभ आदेश देणेत यावा. तसेच नामंजूर टेंडर बयाणा रक्कम अदा करणेस मंजूरी देत आहे.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक 19/10/2023 रोजीचा प्रशासकिय ठराव क्रं.157

विषय – विटा नगरपरिषद हद्दीत लोकशाहीर आण्णा भाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजने अंतर्गत विविध ठिकाणी (प्रभाग क्र.5 मध्ये) विद्युत पोल उभे करणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- 1) मा.मुख्याधिकारी यांनी विदयुत अभियंता यांची दिनांक 19/10/2023 रोजी मंजूर केलेली टिपणी.
2) डॉ.सुरेश (भाऊ) दगडू खाडे पालक मंत्री सांगली जिल्हा तथा कामगार मंत्री महाराष्ट्र शासन यांचे शिफारस पत्र दि. 22/08/2023

विटा नगर परिषद हद्दीतील खालील कामे लोकशाहीर आण्णा भाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजने अंतर्गत घेणे करिता पालक मंत्री सांगली जिल्हा तथा कामगार मंत्री महाराष्ट्र शासन यांचे शिफारस पत्र नगरपरिषदेस प्राप्त झाले आहे. सदरील प्रस्तावित कामे हि अनुसूचित जागेसाठी राखीव असलेल्या प्रभागातील (प्रभाग क्र.5 मधील) आहेत.

1) विटा नगर परिषद हद्दीतील नेहरूनगर कदमवाडा येथील घुमटमाळ रस्त्यालगत श्री. विजय बळवंत कदम यांच्या घरापासून पूर्व बाजूस असणा-या ओढ्या पर्यंत विद्युत पोल उभे करणे. (अं.र.रु. 4,99,554/-)
2) विटा नगर परिषद हद्दीतील नेहरूनगर कदमवाडा येथील श्री. विक्रम भिंगारदेवे यांच्या घरापासून पूर्व बाजूस श्री. रघुनाथ शिंदे घर ते दक्षिण बाजूस श्री. विठ्ठल तुपे यांच्या घरापर्यंत विद्युत पोल उभे करणे. (अं.र.रु.3,92,978/-)
3) विटा नगर परिषद हद्दीतील कदमवाडा परिसरामधून घुमटमाळ कडे जाणा-या रस्त्याच्या पश्चिम दिशेस ढोले कंपाऊंड पर्यंत विद्युत पोल उभे करणे. (अं.र.रु.3,92,978/-)

तरी विटा नगरपरिषद हद्दीतील वरील अ.क्रं. 1 ते 3 कामांना लोकशाहीर आण्णा भाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजने अंतर्गत काम करणेस मंजूरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा